पुण्य नगरी

# ‘सायबर वॉरियर्स’ ; शारदा प्रांगणात प्रभावी ‘सायबर दिंडी’

**बारामती** : क्विक हील फाउंडेशनच्या सहकार्याने विद्यार्थ्यांनी सादर केला सायबर सजगतेचा अभिनव उपक्रम बारामती येथील विद्या प्रतिष्ठान व क्विक हील फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने ‘‘सायबर वॉरियर्स दिंडी’’चे बारामती येथील शारदा प्रांगणात आयोजन केले होते. यावेळी सायबर सुरक्षेची माहिती देणारे फलक, पोस्टर्स आणि घोषवाक्यांसह वारीच्या पद्धतीने प्रभातफेरी काढली.

‘‘सायबर सजगतेचे कीर्तन’’ कार्यक्रमाचे खास आकर्षण ठरले. विद्यार्थ्यांनी ओटीपी फसवणूक, सोशल मीडिया फ्रॉड, पासवर्ड सुरक्षा आदी विषय भक्तिरसात प्रभावीपणे मांडले. नृत्य, घोषवाक्यांच्या गजरात प्रभातफेरी आणि माहितीपत्रकांच्या माध्यमातून नागरिकांशी सजग संवाद साधला. शिवानी चेडे, सागर मेरावी, विनया लाखे व महेश कांडेकर यांनी दिंडीचे नेतृत्व केले. प्रा. डॉ. शिंदे म्हणाले, विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक माध्यमातून दिंडीतील महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या सर्वसामान्य वारकऱ्यांपर्यंत हा संदेश प्रभावीपणे पोहोचवला आहे.’’ या उपक्रमातून सामाजिक भान, सर्जनशीलता व जनजागृती यांचे उत्कृष्ट उदाहरण साकारले गेले.

प्रा. डॉ. भरत शिंदे, महेश पवार व अक्षय भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला.

Pimpri Chinchwad Edition
Jun 28, 2025 Page No. 01
Powered by: erelego.com